**<u>सं.फौ.ख.क्रं.३०२/२०२५</u>**

शासन वि. बबन तागडकर

**<u>नि.क्रं. १०</u>**

सरकारतर्फे साक्षीदार क्रं.१ ची साक्ष शपथेवर सुरु

| | | |
|---|---|---|
| नाव | – | बंडू सदाशिव बाबर |
| वय | – | ३० वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती , |
| राहणार | – | बेलगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. आर. वाघ यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

दि. १३/०५/२०२५ रोजी साहेब फौजदार रोकडे यांनी दारुबंदी छाप्याकामी मला यांनी पोकडी नदीच्या कडेला मिरजगाव गावच्या शिवारात कवडे वस्ती जवळ घटनास्थळ पंचानाम्याकरीता बोलावले नाही. आता मला पंचनामा दाखविला. त्यातील मजकूर मला माहित नाही. पंचनाम्यावरील सही माझीच आहे. ती निशाणी ११ वर आहे.

**<u>सहायक सरकारी वकील यांनी उलटतपासादरम्यान आलेल्या तत्याचे स्पष्टीकरण घेणेकामी फेरतपासणी घेण्याची मागणी केली. आरोपीच्या विधिज्ञांनी कोणताही आक्षेप नोंदवला नाही म्हणून फेरतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.</u>**

हे खरे नाही की, दि. १३/०५/२०२५ रोजी साहेब फौजदार रोकडे यांनी दारुबंदी छाप्याकामी मला यांनी पोकडी नदीच्या कडेला मिरजगाव गावच्या शिवारात कवडे वस्ती जवळ घटनास्थळ पंचानाम्याकरीता बोलावले . हे खरे नाही की माझ्यासोबत दुसरा पंच अशोक चव्हाण होता. हे खरे नाही की, तिथे मला एक इसम बॅरल मध्ये लाकडी काठीने ढवळताना दिसला. हे खरे नाही की पोलीसांना आमची चाहूल लागताच तो इसम तेथून पळून गेला. हे खरे नाही की, ६०० ली. कच्चे रसायन व ५० ली. गावठी हातभट्टी दारु असा एकूण ३५००० रु किमतीचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला. हे खरे नाही की, रासायनिक तपासणीसाठी १८० मिली च्या बाटली नमुना घेतला व उर्वरीत मुद्देमाल जागीच नष्ट केला. हे खरे नाही की पंचनामा मला वाचून दाखविला व खरा असल्याची सही केली

बेलगाव व मिरजगाव मध्ये ५ किमी अंतर आहे. हे खरे नाही की, बेलगावसाठी मिरजगावची बाजारपेठ आहे. बेलगावची लोकसंख्या १७०० आहे. हे खरे नाही की, माझे घर शेतात आहे. हे खरे नाही की आरोपी व माझे चांगले संबंध आहेत मी खोटी साक्ष दिली.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. मेहेत्रे वकील यांच्यामार्फत नाकारला.</u>**

**उलटतपास पुर्ण**.

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT Date: 2026.08.07 18:56:27 +0530

दिनांकः ०७/०८/२०२६

(आर. बी. रारुत)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

न्यायालय क्र. ०२